दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २८२ वा गुरूवार दि.०८ मे २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## पाकविरोधात आणखी मोठी कारवाई होणार?

नवी दिल्ली : पाकिस्तान समर्थिक दहशतवाद्यांनी केलेल्या पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून, भारतीय लष्कराने मध्यरात्री पाकिस्तानात ९ ठिकाणी हवाई हल्ले केले. या हल्ल्यात सूमारे १०० दहशतवादी ठार झाल्याची माहिती आहे.



या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बुधवार दि. ७ मे रोजी जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनाही सीमावर्ती भागात राहणा-या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याच्या सूचना केल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कोणत्याही प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीत सीमावर्ती भागात राहणा-या लोकांना आश्रय देण्यासाठी बंकर तयार ठेवण्यासही त्यांनी संबंधित अधिका-यांना सांगितले आहे. तसेच, सर्व निमलष्करी दलांच्या प्रमुखांना रजेवर असलेल्या कर्मचा-यांना परत बोलावण्याचे निर्देशही दिले आहेत. गृहमंत्र्यांनी देशातील अंतर्गत सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला असून सर्व उच्च सुरक्षा अधिका-यांना सतर्क राहण्यास आणि कडक नजर ठेवण्यासही सांगितले आहे.

ऑपरेशन सिंदूरबाबत गृहमंत्र्यांचे निर्देश

गृहमंत्र्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' हे पहलगाममधील निष्पाप लोकांच्या क्रूर हत्येला भारताने दिलेला प्रतिसाद असल्याचे वर्णन केले. त्यांनी म्हटले की, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार भारत आणि देशातील नागरिकांवरील कोणत्याही हल्ल्याला योग्य उत्तर देण्यासाठी कटिबद्ध आणि दहशतवादाचे उच्चाटन करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक

ऑपरेशन सिंदूरनंतर काही तासांतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक घेतली. याशिवाय ते सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीची बैठकही घेणार आहेत. यात सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेतला जाईल.

## नरेंद्र मोदी स्टेडियम बॉम्बने उडवण्याची धमकी

अहमदाबाद : पहलगाममध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला, या दहशतवादी हल्ल्यामध्ये २६ जणांचा मृत्यू झाला, यामध्ये २५ भारतीय नागरिक तर १ नेपाळी नागरिकांचा समावेश होता. भारताने या हल्ल्याचा बदला घेतला आहे. मध्यरात्री पाकिस्तानवर एअर स्ट्राईक करण्यात आला, या एअर स्ट्राईकमध्ये पीओके आणि पाकिस्तानमधील दहशतवाद्यांचे अड्डे उद्धस्त करण्यात आले आहेत. पाकिस्तानमधील चार तर पीओकेमधील पाच दहशतवादी अड्डे भारताने उद्धस्त केले आहेत, या एअर स्ट्राईकनंतर पाकिस्तानचा चांगलाच जळफळाट झाला आहे.



याचदरम्यान एक मोठी बातमी समोर येत आहे, ती म्हणजे गुजरातमधील नरेंद्र मोदी स्टेडियमला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. गुजरात क्रिकेट असोसिएशनला धमकीचा मेल प्राप्त झाला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार हा धमकीचा मेल पाकिस्तानातून करण्यात आला आहे, या मेलमध्ये स्टेडियमला बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. नरेंद्र मोदी स्टेडियम हे देशातील सर्वात मोठे स्टेडियम आहे, दरम्यान धमकीचा मेल आल्यानंतर आता पोलिस अलर्ट मोडमध्ये आले असून, पोलिसांकडून धमकीच्या ई-मेलबाबत चौकशी सुरू करण्यात आली आहे. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानमध्ये घुसून बदला घेतला आहे, मध्यरात्री पाकिस्तान आणि पीओकेवर एअर स्ट्राईक करण्यात आला, या एअर स्ट्राईकमध्ये पीओकेमधील ५ तर पाकिस्तानमधील चार दहशतवाद्यांची ठिकाणं उद्धवस्त करण्यात आली आहेत, या एअर स्ट्राईकमध्ये १०० पेक्षा अधिक दहशतवादी ठार झाल्याची माहिती समोर येत आहे.

दुसरीकडे मात्र पाकिस्तान उलट्या बोंबा मारत असल्याचे दिसून येत आहे, जिथे एअर स्ट्राईक झाला, तिथे दहशतवाद्यांचे अड्डे नव्हतेच असा दावा पाकिस्तानने केला आहे, तसेच आमच्या २६ लोकांचा मृत्यू झाला असून ४६ जण जखमी झाल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. भारताने आमच्यावर नुसताच हल्ला नाही केला तर आमची मजाक उडवली आहे, आम्ही लक्षात ठेऊ अशी प्रतिक्रिया पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी संसदेमध्ये बोलताना दिली आहे. तर दुसरीकडे अमेरिकेकडून पाकिस्तानला भारतासोबत युद्ध न करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकविरुद्ध आणखी एक कारवाई? ; गृहमंत्री अमित शाहांनी सैनिकांना दिले 'हे' आदेश

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तानात केलेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बुधवारी सर्व निमलष्करी दलांच्या प्रमुखांना रजेवर असलेल्या कर्मचाऱ्यांना परत बोलावण्याचे निर्देश दिले. शाह जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या सतत संपर्कात आहेत. सीमावर्ती भागात राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याची खात्री करण्यासही त्यांनी सांगितले.



आपत्कालीन परिस्थितीत नागरी लोकसंख्येला आश्रय देण्यासाठी बंकर तयार ठेवण्यासही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले आहे, असे सूत्रांनी सांगितले. ते म्हणाले की, गृहमंत्र्यांनी सर्व केंद्रीय सशस्त्र पोलिस दलांच्या प्रमुखांना रजेवर असलेल्या कर्मचाऱ्यांना परत बोलावण्याचे निर्देश दिले आहेत. शहा यांनी देशातील अंतर्गत सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला आणि उच्च सुरक्षा अधिकाऱ्यांना सतर्क राहण्यास आणि कडक नजर ठेवण्यास सांगितले.

ऑपरेशन सिंदूरबाबत गृहमंत्र्यांचे निर्देश

गृहमंत्र्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' हे पहलगाममधील निष्पाप लोकांच्या क्रूर हत्येला भारताने दिलेला प्रतिसाद असल्याचे वर्णन केले. त्यांनी असेही म्हटले की नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार भारत आणि त्याच्या लोकांवरील कोणत्याही हल्ल्याला योग्य उत्तर देण्यासाठी कटिबद्ध आहे आणि भारत दहशतवादाचे उच्चाटन करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय लष्कराने ही कारवाई केली. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला.

केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक

भारतीय सुरक्षा दलांनी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळ उद्धस्त करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू केल्यानंतर काही तासांतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (७ मे) केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक घेतली. सूत्रांनी सांगितले की ते सुरक्षा विषयक कॅबिनेट समिती च्या बैठकीचे अध्यक्षस्थान देखील घेतील, ज्यामध्ये सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेतला जाईल. सूत्रांनी सांगितले की, संरक्षण दलांकडून रात्रीच्या वेळी केल्या जाणाऱ्या कारवाईचा प्रस्तावही बैठकीत मंजूर केला जाऊ शकतो. भारतीय सशस्त्र दलांनी मंगळवारी आणि बुधवारी रात्री पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्र हल्ले केले, ज्यात बहावलपूरमधील जैश-ए-मोहम्मदचा बालेकिल्ला आणि मुरीदके येथील लष्कर-ए-तोयबाचा अड्डा यांचा समावेश आहे.

## पुणे ते नागपूर प्रवास २ ते ३ तासांवर येणार? वंदे भारत रेल्वेबद्दल अश्विनी वैष्णव यांनी दिले संकेत, नवी माहिती काय? वाचा

केंद्र सरकारने देशातील विविध भागांमध्ये सेमी हायस्पीड असलेली वंदे भारत ही रेल्वेसेवा सुरू केलेली आहे. महाराष्ट्रातील अनेक रेल्वे मार्गांवर वंदे भारत रेल्वे धावत आहे. वंदे भारत या रेल्वेसेवेला प्रवाशांचा देखील उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या पार्श्वभूमीवर आता महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणे आणि उपराजधानी नागपूर ही दोन शहरे वंदे भारत रेल्वेसेवेने जोडली जाणार आहे. तसे संकेत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिले आहेत. या रेल्वे सेवेमुळे पुणे ते नागपूर हे अंतर काही तासांमध्ये पूर्ण करता शक्य होणार आहे. मात्र, ही रेल्वे सेवा कधी सुरू केली जाणार याबद्दल माहिती मिळालेली नाही. नागपूर-पुणे या राज्यातील सर्वात व्यस्त मार्गावर वंदे भारत सेवा सुरु करण्याबद्दल उपमुख्यमंत्र्यांसोबत चर्चा झाल्याची माहिती केंद्रीय रेल्वे मंत्र्यांनी नुकत्याच दोन मार्गांवर रेल्वे मार्गांना हिरवा झेंडा दाखवताना सांगितले आहे. सध्या या अत्यंत दोन महत्वाच्या शहरांमध्ये रेल्वेने प्रवास करण्यासाठी साधारण १४ ते १६ तासांचा कालावधी लागत आहे. ही रेल्वेसेवा सुरू झाल्यानंतर थेट हा प्रवास २ ते ३ तासांवर येणार असल्याचे सांगितले जात आहे.



अनेकदा पुणे ते नागपूर धावत असणाऱ्या रेल्वेचे कन्फर्म तिकीट प्रवाशांना मिळत नाही. या आणि अशा अनेक तक्रारी प्रवाशांच्या आहेत. यामुळे वंदे भारत ही रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी गेल्या बराच काळापासून केली जात आहे. यामुळे वंदे भारत ही सेमी हायस्पीड ट्रेन पूर्णपणे एसी ट्रेन असल्याने इतर धावणाऱ्या ट्रेन्सला उत्तम पर्याय ठरु शकते.

## बॅनर फाडणाऱ्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी उपोषण : बॅनर्स फाडतानाचे सीसीटीव्ही फूटेज झाले व्हायरल

### पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या लेखी आश्वासनानंतर तात्पुरत्या स्वरूपात उपोषण मागे

केज/प्रतिनिधी बॅनर फाडणाऱ्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी केज तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण, बॅनर्स फाडतानाचे सीसीटीव्ही फूटेज झाले व्हायरल झाले आहे.

नायब तहसीलदार अशोक भंडारे,दलित चळवळीतील नेते आणि विविध संघटनेचे व पक्षाचे लोकप्रतिनिधी यांच्यासह पत्रकार बांधवांच्या मध्यस्थीने पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण करर्ते तात्या गवळी यांनी तात्पुरत्या स्वरूपात उपोषण मागे घेतले असून यावेळी माध्यमाची बोलताना तात्या गवळी म्हणाले की, पोलीस प्रशासनाने दिलेल्या आश्वासना मुळे मी आज रोजी माझे उपोषण तात्पुरत्या स्वरूपात मागे घेत आहे परंतु जर पोलीस प्रशासनाने माझ्या मागणीचे दखल घेतली नाही तर यापुढे तीव्र व उग्र स्वरूपाचे आंदोलन करणार असल्याचा प्रशासनास इशारा दिला आहे.




राष्ट्रपुरुषांचे फोटो असलेले बॅनर काही समाजकंटकांनी फाडल्याने त्यांच्या राष्ट्रपुरुषांचा अवमान झाला असून नागरिकात तीव्र संताप उमटला आहे. या बाबतची माहिती अशी की, दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी मध्यरात्री १:४५ ते२.०० वाजण्याच्या सुमारास एका चार चाकी गाडीचे नुकसान करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोसह सर्व राष्ट्रपुरुषांचे फोटो असलेले आणि शुभेच्छुक तात्या गवळी यांचा फोटो असलेले बॅनर हे सुमित कैलास लांडगे यान फाडले. हा प्रकार एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. बॅनर फाडणारा सुमित लांडगे हा बॅनर फाडून नाचून व हसून त्या ठिकाणी बाजूलाच असलेल्या त्याच्या साथीदाराला दाखवल आहे. त्या ठिकाणाहून काही त्याचे साथीदार हे पळून जात असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहेत. सुमित लांडगे व त्याच्या इतर साथीदाराने जाणीवपूर्वक बॅनर फाडून राष्ट्रपुरुषांचा अवमान केला आहे. या पूर्वी मागील दोन ते तीन वर्षा पासून या समाजकंटकांनी या भागात दहशत पसरली असून ते कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचे काम करत आहेत. त्यांच्यामुळे या भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात सतत त्रास होत आहे. त्याच बरोबर या भागातील काही वाहनांच्या बॅटऱ्या व मोटरसायकलसह इतर वस्तू देखील चोरीला गेलेल्या आहेत. त्यामध्ये यांचा समावेश असण्याची शक्यता आहे.

सदर घटना ही दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी मध्यरात्री घडली असुन दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी पोलीसांना सदर प्रकरणाची सर्व माहिती माहित असतांना देखील अद्याप ही आरोपी विरुद्ध कारवाई केलेली नाही. या समाजकंटकांनी राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमा असलेले बॅनर फाडून अवमान करुन समाज बांधवांच्या भावना दुखावल्या असतांना देखील पोलीसांनी सदर प्रकरणी गांर्भीय पुर्वक कार्यवाही करण्यात गरजेचे असतांना कार्यवाही केली नाही. यामुळे तात्या गवळी यांनी व्यथित होऊन दिनांक ७ मे २०२५ रोजी तहसील कार्यालया समोर आमरण उपोषणाला बसले होते. दरम्यान या उपोषणाला दलित चळवळतील अनेक नेत्यांनी व राजकीय पक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्यांसह पत्रकार बांधवांनी भेटी देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे. नायब तहसीलदार अशोक भंडारी, संघटनेच्या व पक्षाचे पदाधिकारी आणि पत्रकार बांधवांच्या विनंतीला मान देऊन पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या लेखी आश्वासनानंतर तात्पुरत्या स्वरूपात तात्या गोळी यांनी त्यांचे आमरण उपोषण मागे घेतले आहे. सदर प्रकरणी तपास वेगाने करून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने कायदेशीर कारवाई करण्यात येईल व राष्ट्रपुरुषांचे बॅनर फाडणाऱ्या समाजकंटकासह त्याचे साथीदार व त्यांच्या मुख्य सूत्रधारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्याचबरोबर उपोषण करर्ते तात्या गवळी यांच्या मागण्या प्रमाणे सदर प्रकरणी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत लवकरच लेखी दिलेल्या आश्वासनानुसार कारवाई केली जाणार आहे.

## देश २०४० पर्यंत चंद्रावर

नवी दिल्ली : पंतप्रधान मोदी म्हणाले की २०४० पर्यंत भारतीय अंतराळवीर चंद्रावर पोहोचेल. येत्या आठवड्यात एक भारतीय आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणार आहे. ही भारतासाठी अभिमानाची गोष्ट आहे. चंद्राव्यतिरिक्त, मंगळ आणि शुक्र देखील आपल्या रडारवर आहेत. पंतप्रधान बुधवारी अंतराळ संशोधनावरील जागतिक परिषदेत सहभागी झाले. पंतप्रधान म्हणाले की, चांद्रयान-१ ने चंद्रावर पाण्याचा शोध लावण्यास मदत केली. चांद्र्रयान-२ मोहीम यशस्वी झाली. चांद्रयान-२ ने उच्च रिझोल्यूशनचे फोटो पाठवले होते. भारतीय अंतराळवीर लवकरच अंतराळात जाणार आहेत. पंतप्रधान मोदी म्हणाले, अवकाश हे फक्त एक गंतव्यस्थान नाही. ही उत्सुकता, धाडस आणि सामूहिक प्रगतीची घोषणा आहे. भारतीय अंतराळ प्रवास या भावनेचे प्रतिबिंबित करतो. १९६३ मध्ये एक लहान रॉकेट प्रक्षेपित करण्यापासून ते चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ उतरणारा पहिला देश बनण्यापर्यंतचा आमचा प्रवास उल्लेखनीय राहिला आहे. भारताचा अंतराळातील प्रवास कौतुकास्पद आहे. आमचे रॉकेट फक्त पेलोडपेक्षा बरेच काही वाहून नेतात. भारतातील माजी विद्यार्थी महत्त्वाचे वैज्ञानिक टप्पे गाठतात. मंगळ, शुक्र भारताच्या रडारवर २०४० पर्यंत भारतीय अंतराळवीर चंद्रावर उतरणार आपले पहिले मानवी अंतराळ मोहीम, गगनयान, आपल्या देशाच्या वाढत्या आकांक्षा अधोरेखित करते. येत्या काही आठवड्यात, एक भारतीय अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर इस्रो-नासा यांच्या संयुक्त मोहिमेचा भाग म्हणून अंतराळात प्रवास करेल. २०३५ पर्यंत, भारतीय अंतराळ स्थानक संशोधन आणि जागतिक सहकार्यात नवीन आयाम उघडेल.




दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## अंबाबाई आणि जोतिबा मंदिर विकासात डॉ. प्रतापसिंह जाधव यांचे मोलाचे योगदान

दक्षिण काशी कोल्हापुरातील श्री अंबाबाई मंदिर हे साडेतीन शक्तिपीठांपैकी एक, तर दख्खनचा राजा श्री जोतिबा हे महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा, आंध्रातील भक्तगणांचे आराध्य दैवत. कोट्यवधी भाविकांची ही दैवते. मात्र, या प्राचीन मंदिरांच्या विकासाच्या दृष्टीने खर्या अर्थाने कोणी तळमळीने प्रयत्न केले असतील आणि विकासकामांना चालना दिली असेल तर ती 'पुढारी'चे मुख्य संपादक पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी. श्री अंबाबाई मंदिर पुनर्विकास आराखड्यासाठी महाराष्ट्र मंत्रिमंडळाने १,४४५ कोटी रुपये मंजूर केले आहेत, तर श्री जोतिबा मंदिर परिसर संवर्धन आराखड्यास २८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याशिवाय सार्वजनिक बांधकाम खाते, महावितरण अशा वेगवेगळ्या विभागांतर्फे विकासासाठी २५० कोटी रुपयांची तरतूदही करण्यात आली आहे. राज्य सरकारने हे महत्त्वाचे निर्णय घेतले, या निर्णयासाठी प्रतापसिंह जाधव यांनी सातत्याने पाठपुरावा केला आणि जोतिबा मंदिर विकासासाठी लोकनिधी उभारून परिसर विकास घडवला, हे लक्षात घेतले पाहिजे. अंबाबाई आणि जोतिबा मंदिर विकासासाठी राज्य सरकारने केलेल्या आर्थिक तरतुदीचे स्वागत करताना प्रतापसिंह जाधव यांनी त्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत; किंबहुना आता हा जो विकास होणार, त्याचे ते प्रणेतेच म्हटले पाहिजे.

नांदेडच्या गुरू-दा-गद्दीला २००८ साली तीनशे वर्षे पूर्ण झाली तेव्हा केंद्र सरकारने २,००० कोटी रुपयांचा निधी देऊन नांदेडचा आमूलाग्र कायापालट घडवला. अंबाबाई मंदिर हे तब्बल १,४०० वर्षांहूनही प्राचीन. मात्र, मंदिर आणि परिसर यांचा कसलाही काडीमात्र विकास झालेला नाही. हे लक्षात घेऊन प्रतापसिंह जाधव यांनी अंबाबाई मंदिर विकासाचा ध्यासच घेतला. नांदेड गुरू-दा-गद्दीचा विकास आराखडा मुंबईच्या 'फोर्टिस' कंपनीने केला होता. त्याच कंपनीकडून त्यांनी अंबाबाई मंदिर विकासाचा आराखडा तयार करून घेतला. जिल्ह्यातील नृसिंहवाडी, खिद्रापूर, बाहुबली आदी तीर्थक्षेत्रे लक्षात घेऊन सार्या जिल्ह्याचा हा आराखडा होता. हा आराखडा तेव्हा १,०४२ कोटींचा होता. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख २२ नोव्हेंबर २००८ रोजी कोल्हापूर दौर्यावर आले होते. प्रतापसिंह जाधव यांच्या प्रयत्नांतून त्यांनी हॉटेल व्हिक्टर पॅलेस येथे व्यापक बैठक घेतली. 'फोर्टिस'चे संचालक कुमार यांनी आराखड्याचे सादरीकरण केले. प्रतापसिंह जाधव यांनी मुख्यमंत्र्यांना आराखड्याची प्रत दिली. विलासराव देशमुखांनी कोल्हापूरला 'होली सिटी'चा दर्जा द्यायची घोषणा केली, तसेच या आराखड्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण नेमण्याचीही घोषणा केली.

२६/११ च्या मुंबई हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर विलासराव देशमुख यांनी निर्माते रामगोपाल वर्मा यांच्यासोबत ताजमहाल हॉटेलला भेट दिली. त्या प्रकरणात देशमुख यांना राजीनामा द्यावा लागला. देशमुख यांच्या जागी अशोक चव्हाण मुख्यमंत्री झाले. ते ५ मार्च २०१० रोजी कोल्हापूर दौर्यावर आले होते. त्यावेळी आपल्या निवासस्थानी होम थिएटरमध्ये जाधव यांनी त्यांना हा आराखडा दाखविला. त्यानंतर चव्हाण यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. त्यावेळी आराखड्याला मान्यता देऊ, अशी घोषणा त्यांनी केली. 'आदर्श' प्रकरणात अशोक चव्हाण यांना पद सोडावे लागले. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री झाले. त्यांनी आराखड्यासाठी तरतूद करू, अशी ग्वाही दिली. दरम्यान, कोल्हापूर महापालिकेने फक्त अंबाबाई परिसर विकासाचा १९० कोटींचा आराखडा शासनाला सादर केला. प्रतापसिंह जाधव यांनी याही आराखड्यासाठी पाठपुरावा केला. २००८ ते २०१४ या सहा वर्षांत तीन मुख्यमंत्र्यांकडे त्यांनी यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

२०१५ मध्ये दै. 'पुढारी'च्या अमृतमहोत्सवासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यावेळी जाधव यांनी कोल्हापूरच्या अन्य मागण्यांबरेबर अंबाबाई तीर्थक्षेत्र विकासाची मागणी जाहीररीतीने मांडली. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात या मागण्यांची दखल घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रश्न मार्गी लावतील, अशी ग्वाही दिली. फडणवीस यांनी गांभीर्याने या मागणीत लक्ष घातले. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयाने अंबाबाई मंदिर कॉरिडॉर हा मंदिर परिसर विकासाचा एक हजार कोटींचा आराखडा तयार करून शासनाच्या मंजुरीसाठी पाठवला. हा आराखडा मार्गी लावण्यासाठीही ते प्रयत्नशील राहिले आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे त्यांनी ही मागणी लावून धरली आणि आता अंबाबाई मंदिर पुनर्विकास आराखडा मंजूर होऊन १४४६ कोटी रुपयांची तरतूद झाली आहे.

श्री जोतिबा मंदिर परिसर विकास

अंबाबाई मंदिर परिसर विकासाप्रमाणे जोतिबा मंदिर परिसर विकासासाठीही त्यांनी अथक यशस्वी प्रयत्न केले आहेत. १९९० मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी जोतिबा मंदिर विकासासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील खासदार, आमदार व नेत्यांची बैठक बोलावली होती. विकास आराखडा कार्यवाहीसाठी समिती नेमावयाची आहे, त्यासाठी अध्यक्षांचे नाव सुचवा, असे पवार यांनी बैठकीत सूतोवाच केले. तेव्हा बाळासाहेब माने, उदयसिंहराव गायकवाड, प्रकाशबापू पाटील, देवस्थानचे अध्यक्ष डॉ. डी. वाय. पाटील अशी नावे पुढे आली. तथापि, हा खर्च लोकनिधीतून करायचा आहे, सरकार काही देणार नाही, असे पवार यांनी स्पष्ट करताच बैठकीत शांतता पसरली. तेव्हा खा. बाळासाहेब माने यांनी निधी उभारणे आणि विकासकामे करून घेणे, ही जबाबदारी 'पुढारी'चे मुख्य संपादक प्रतापसिंह जाधव हे पार पाडू शकतील, असे सांगितले. पवार यांनी तातडीने जाधव यांना बोलवायला सांगितले. तत्कालीन जिल्हाधिकारी शिवाजीराव देशमुख यांनी लगेच निरोप पाठवला. प्रतापसिंह जाधव बैठकीला आले. पाच कोटींचा निधी उभा करणे, त्यातून परिसर विकासाची कामे करणे, असे जबाबदारीचे स्वरूप असल्याचे शरद पवार यांनी सांगितले. आपण निधीची जबाबदारी घेऊ. मात्र विकासकामे शासकीय यंत्रणेने करावीत, अशी भूमिका जाधव यांनी मांडली. पवार यांनी ती मान्य केली. पाठोपाठ सहाच महिन्यांत ३१ जानेवारी १९९१ रोजी जोतिबा डोंगरावरील विकास करण्याचा जाधव यांनी शुभारंभ केला. रस्ता, पिण्याचे पाणी, वनीकरण, स्वच्छतागृहे, सांडपाणी निर्गत, भक्त निवास अशा विविध कामांना युद्धपातळीवर प्रारंभ झाला.

# सावधान!देख ले पाकिस्तान सिन्दुर मे कितनी ताकद होती है.

पाकिस्तानने नेहमीच आतंकवाद्यांच्या मदतीने भारतावर छुपे हल्ले करून शांती भंग करण्याचे काम केले व भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले आहे.यावर भारताने सुध्दा अनेक कारवाया सुरू पाकिस्तानला जशास तसे प्रत्युत्तर सुध्दा दिले. परंतु पहलगाममध्ये पाकिस्तानने आतंकवाद्यांच्या मदतीने २८ निरअपराध पर्यटकांचा बळी घेतला व त्यांचे सिन्दुर पुसण्याचे घृणास्पद काम केले ही सर्वात मोठी घोडचूक पाकिस्तानने करून भारतीय संस्कृतीवर हात टाकण्याचे काम केले.कारण सिन्दुर काय असते हे पाकिस्तानला माहीतच नाही.परंतु सिन्दुरमध्ये किती ताकद व हुंकार असते ही बाब भारताला,भारतीय संस्कृतीला, भारतीय मुस्लिमांसह संपूर्ण धर्मांच्या लोकांना चांगल्याप्रकारे ग्यात आहे.त्यामुळे सिन्दुरची रक्षा करण्याचे दायित्व भारतीय सेनेने स्विकारले असुन संपूर्ण १४० कोटी जनाता भारतीय जवानांन सोबत उभी आहे आणि जगातील अनेक देशांसह मुख्यत्वे करून मुस्लीम देशांनी सुध्दा भारतीय कारवाईचे स्वागत केले आहे एवढी मोठी ताकद सिन्दुरमध्ये असते ही बाब पाकिस्तानने लक्षात ठेवली पाहिजे.पहलगाम हल्ला हा सरळ भारतीय संस्कृतीवर हल्ला होता.पहलगाम हल्ल्यामध्ये पाकिस्तानी आतंकवाद्यांनी भारतीय महिलांचे सिन्दुर पुसण्याची सर्वात मोठी चुक केली आहे.भारतीय संस्कृतीत सिन्दुरला किती महत्त्व असते ही बाब ऑपरेशन सिन्दुरने पाकिस्तानला दाखवून दिली आहे.भारताने आतापर्यंत पाकिस्तानी आतंकवाद्यांवर कारवाया केल्यात आणि अनेक आतंकवाद्यांना यमलोक सुध्दा पाठविले.परंतु ऑपरेशन सिन्दुर असा ऑपरेशन आहे की भारत, पाकिस्तानला चिडफार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही आणि त्याला घरात घुसून मारेल तेच काम ऑपरेशन सिन्दुरने केले.चुटकीभर सिन्दुरमध्ये किती ताकद असते ही बाब भारताने पाकिस्तानी आतंकवाद्यांचे ९ कॅम्प उध्वस्त करून दाखवून दिली आहे.भारताची ऑपरेशन सिन्दुर ही कारवाई आरपारची असल्याचे स्पष्ट दिसून येते.ऑपरेश सिन्दुर एअर स्ट्राईक अशा पध्दतीने केला की त्याची कल्पना पाकिस्तान सुध्दा करू शकत नाही.कारण भारतीय सेनेने पाकिस्तानमध्ये असलेले ९ आतंकवादी कॅम्प उध्वस्त करून जगाला एक संदेश दिला की पाकिस्तानने भारतावर जीतक्याही आतंकवाद्यां कारवाया केल्या असेल त्याचा संपूर्ण बदला भारत सरकार ऑपरेशन सिन्दुर मार्फत शेवटच्या क्षणापर्यंत घेईल हे भारताने जगाला दाखवून दिली.आता आतंकवादी कारवायांच्या बाबतीत भारत सरकार सुईच्या टोकाएवढाही समझोता करणार तर नाहीच उलट मदत करणाऱ्यांना सुध्दा सोडणार नाही ही बाब स्पष्ट झाली आहे.भारताने पाकिस्तानच्या १०० किलोमीटर हद्दीत घुसून एअर स्ट्राईक केला यात ९० पेक्षा अधिक आतंकवादी मारल्या गेल्याचे सांगितले जाते. भारत हा जगासाठी शांती दुत आहे आणि त्या पध्दतीने जगासाठी कार्य सुध्दा करीत आहे. परंतु जर कोणी भारताच्या विरूद्ध तिरप्या नजरेने जो-जो पाहिल त्याला नेस्तनाबूत केल्या जाईल ही बाब ऑपरेशन सिन्दुरने स्पष्ट करून दाखविली आहे आणि जगाने सुध्दा पाहीली.महत्वाचे म्हणजे या ऑपरेशनमध्ये आतंकवाद्यांचा टॉप कमांडर मसुर अझरच्या १० नातेवाईक मारल्या गेल्याचे सांगितले जाते.त्यामुळे सिन्दुर ऑपरेशनने पाकिस्तानला स्पष्ट संदेश दिला आहे की भारत जितका शांत आहे त्याच्या हजार पटीने अक्राळविक्राळ रूप धारण करू शकते.ऑपरेशन सिन्दुर हा पाकिस्तानसाठी फक्त ट्रेलर आहे आगे आगे होता है क्या ही बाब पाकिस्तानने व जगाने सुध्दा पाहावी. शरमेची गोष्ट म्हणजे काही दिवसांपूर्वी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी काश्मीरचा मुद्दा उपस्थित करून आग ओकण्याचे काम केले होते.यामुळे पाकिस्तानी जनता व तेथील विरोधी पक्षसुध्दा त्यांच्या विरोधात गेले होते.त्यामुळे एवढ्या मोठ्या पदावर विराजमान असीम मुनीर यांनी केव्हा काय बोलावे हे सुध्दा यांना माहीत नाही मग हे कसे काय पाकिस्तानची रक्षा करणार. आज भारताच्या एअर स्ट्राईकमुळे पाकिस्तानी जनता अमीम मुनीर ला व पाकिस्तान सरकारला कोसत आहे.पाकिस्तान अब भी वक्त सुधरजा नहीं तो तेरा अंत निश्चित है.पाकिस्तानला त्याची जागा दाखविण्याकरीता भारत सरकार एअर स्ट्राईक करीत आहेच.परंतु त्याला नेस्तनाबूत करण्यासाठी संपूर्ण भारतभर मॉक ड्रिलला सुध्दा सुरूवात झाली आहे म्हणजेच ही पाकिस्तान सोबतची आरपारची लढाई आहे.कारण पाकिस्तानचा पापाचा घडा संपूर्णपणे भरलेला आहे.जय हिंद!

***********लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# निवडणुकांचा मार्ग मोकळा

गेल्या तीन वर्षांहून अधिक काळ रखडलेल्या महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मोकळा झाला आहे. पुढील चार महिन्यांत या निवडणुका व्हायच्या आहेत. यामध्ये महापालिका, जिल्हा परिषदा, नगरपालिका, पंचायत समिती या सर्वच पातळ्यांवरील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार चार आठवड्यांच्या आत या निवडणुकांची अधिसूचना जारी करावी लागणार आहे आणि नंतर चार महिन्यांच्या आत प्रत्यक्ष निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. त्यामुळे पावसाळ्याचे कारण देऊन या निवडणुका पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता नाही.

याआधी करोना काळामुळे ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची मुदत संपली होती तेथे होणार्या निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या, त्यानंतरच्या काळात ओबीसी आरक्षणाचा विषय पुढे आला आणि त्यामुळे या निवडणुका न्यायालयीन प्रक्रियेत अडकल्या. मार्च २०२२ मध्ये या निवडणुकांना स्थगिती मिळाली आणि तेव्हापासून निवडणुकांचे हे भिजत घोंगडे तसेच पडले होते. पण आज अचानक सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय आल्याने आता स्थानिक पातळीवरील सर्व कारभार तेथील लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हातात जाणार आहे ही दिलासाजनक बाब आहे.

या सगळ्या प्रक्रियेत राज्य शासन या निवडणुका घ्यायला फार उत्सुक नव्हते किंवा शक्य होईल तेवढ्या त्या लांबणीवर टाकण्याच्याच प्रयत्नात होते असा आरोप वारंवार झाला आहे. लोकनियुक्त सभासदांची मुदत संपल्यानंतर सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांचे कारभार मुख्य अधिकारी किंवा आयुक्तांच्या हातात गेले आणि त्यांना हाताशी धरून राज्य सरकारने मनमानी केली आणि नको असलेली कामे त्या त्या शहरांवर लादली गेली असाही एक आरोप आहे. मुंबई महापालिकेत प्रशासकांची राजवट असल्याने तेथेही हजारो कोटी रुपयांची उधळपट्टी झाल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांनी वेळोवेळी पत्रकार परिषदा घेऊन केला आहे.

तेथे मुंबई महापालिकेची सर्रास लूट केली गेली असे त्यांचे म्हणणे आहे. पुण्यातही अशाच प्रकारची लूट झाल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी केला आहे. त्यांनी म्हटले आहे की पुणे महापालिकेच्या तीन वर्षांपासूनच्या अधिकच्या प्रशासकाच्या राजवटीत हजारो कोटी रुपयांची नको असलेली कामे केली गेली आणि ती राज्य सरकारच्या मर्जीतल्या ठेकेदारांना दिली गेली. त्यातून पुणे महापालिकेची ही लूट झाली आहे.

या कालावधीत पुणे महापालिकेवर तब्बल दहा हजार कोटी रुपयांचे जादाचे कर्ज झाले आहे, असे प्रशांत जगताप यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता निवडणुका होऊनही महापालिकेवर निवडून येणार्या लोकप्रतिनिधींना मनासारखे काम करता येणार नाही, कारण हा कर्जाचा बोजा कसा उतरवायचा हा मुख्य प्रश्न त्यांच्या पुढे असणार आहे. पुणे मुंबईच नव्हे तर राज्यातल्या अन्य मोठ्या शहरातील महापालिकांमध्येही असाच प्रकार झाल्याचा दावा केला जात आहे. महापालिकेचा कारभार प्रशासकाच्या हातात राहिल्याने त्याला हाताशी धरून राज्य सरकारला हवी तिथे मनमानी करता आली असे सर्वसाधारण तक्रारीचे स्वरूप आहे, पण आता मात्र वातावरण मोकळे होणार असून पुढील चार महिन्यांत लोकनियुक्त सदस्यांच्या हातात स्थानिक प्रशासनाचा कारभार जाणार आहे.

अर्थात, महापालिका किंवा अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात निवडून येणारे सर्वच लोकप्रतिनिधी अगदी धुतल्या तांदळासारखे असतात असे कोणीही म्हणणार नाही, त्यांच्याकडूनही त्या त्या पातळीवर काही गडबड होत असतेच, पण यातला महत्त्वाचा भाग असा की शहरातल्या प्रत्येक बारीक सारीक कोपर्याला आता प्रशासनाच्या कारभारात महत्त्व मिळेल आणि त्यांची तेथे अडलेली कामे मार्गी लागतील. ओबीसी आरक्षण या एका महत्त्वाच्या मुद्द्यावर या निवडणुका रखडल्या होत्या. या निवडणुकांच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयात एकूण सुमारे ३३ याचिका दाखल आहेत, त्या याचिकांवरील अधिकृत निर्णय अद्याप यायचा असला तरी निवडणूक मात्र त्याच्या आधीच होणार आहे. त्यामुळे यापूर्वी झालेल्या निवडणुकातील आरक्षणानुसार आणि प्रभाग रचनेनुसार या निवडणुका होतील हे स्पष्ट आहे. पुण्यात चार वॉर्डाचा प्रभाग या हिशेबाने निवडणुका होणार आहेत, असे सांगितले जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातही पक्षीय राजकारणाला महत्त्व असतेच. त्यामुळे आता पुढच्या काही महिन्यांचे वातावरण हे स्थानिक व पक्षीय राजकारणातून ढवळून निघणार आहे.

महायुती आणि महाविकास आघाडी असा सरळ सामना याही निवडणुकीत दिसणार असला तरी युती किंवा आघाडी यामध्ये स्थानिक पातळीवर वेगवेगळी समीकरणे असल्याने तेथे युती किंवा महाविकास आघाडी कायम राहण्याची कितपत शक्यता आहे याविषयीही शंका आहे. तूर्तास आता नागरिकांनी मात्र त्यातल्या त्यात बरा आणि सक्षम उमेदवार निवडून देण्याला फार महत्त्व आहे. स्थानिक राजकारणात गुंडांचा शिरकाव होणार नाही, भ्रष्टाचार्यांना मुक्त वाव मिळणार नाही याची खबरदारी आता नागरिकांना घ्यावी लागेल तरच, त्यांचा शहराचा कारभार काही अंशी तरी चांगला चालू शकणार आहे.



# नव्या बदलाची नांदी!


प्राथमिक स्तरापासून उच्चशिक्षणापर्यंत शिक्षणाचा विस्तार हा प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे करण्यावर नवीन शैक्षणिक धोरणामध्ये विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे.

कुठल्याही राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शिक्षण हा पाठीचा कणा असतो. राष्ट्रजीवनातील कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य व सुरक्षा या पाच प्रमुख घटकांपैकी शिक्षण हा एक पायाभूत घटक असून गुणवत्ताप्रधान शिक्षणावर राष्ट्रीय विकासाचा वेग अवलंबून असतो. जागतिक बँकेच्या सन २००० नंतरच्या काही प्रमुख वार्षिक अहवालांमध्ये 'भारताचा राष्ट्रीय विकास वेग कमी असण्याचे मुख्य कारण दुबळे उच्चशिक्षण असल्याचे नमूद केले होते. नव्या प्रगतस्तर अद्ययावत जगातील माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव आणि बदललेले उद्योग जगातील नव्या रोजगार संधी यामुळे अशा सुसंगत व सुनियोजित शैक्षणिक धोरणाची आवश्यकता वारंवार प्रतिपादन केली जात असे.

संख्यात्मक वाढ, गुणवत्तेची निकड व विविध स्तरांवरील संतुलन या बाबी लक्षात घेऊन नव्या धोरणाची आखणी करण्यात आली. २९ जुलै २०२० रोजी या नवीन धोरणास मंजुरी देण्यात आली. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत नवी क्रांतिकारक दिशा देण्याचे कार्य या धोरणामुळे शक्य झाले आहे. तसेच शिक्षण मातृभाषेतून देण्यावर भर देण्यात आला आहे. शिक्षणाची प्रक्रिया ही 'आनंददायी' तसेच सर्जनशील करण्यावर नव्या धोरणामध्ये अग्रक्रम देण्यात आला आहे. संशोधकवृत्तीची जोपासना, नवकल्पनांचा गतीने विकास व प्रसार करणे त्यामुळे शक्य होईल.

नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये प्रमुख अडचणी पाहाता प्रादेशिक विविधता, यंत्रणांतील शैथिल्य, निधीची कमतरता व प्रगत तंत्रज्ञानाची उपलब्धता आणि वेग, अपुरी शिक्षक प्रशिक्षण यंत्रणा, पूरक पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी लागणारा वेळ इत्यादी अनेक समस्या आहेत. पण प्रबळ इच्छाशक्ती आणि निर्धार तसेच कल्पक नियोजन या आधारे हे धोरण आगामी पाच वर्षांमध्ये निश्चितपणे कृतीत येईल. नवीन शैक्षणिक धोरणाचे पडसाद राष्ट्रीय जीवनामध्ये दिसू लागतील हे मन्वंतर गतीने घडावे म्हणून प्रगत व कालसापेक्ष आणि गतिमान असा कृती आराखडा तयार केला जात आहे. त्यामुळे शिक्षणाबरोबरच राष्ट्रीय विकासाच्या सर्व क्षेत्रांत नवचैतन्य येईल आणि देश आत्मनिर्भर व स्वावलंबी बनू शकेल. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला उदार कलाशिक्षणाची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन कला, मानवी विद्या तसेच विज्ञान-तंत्रज्ञान यातील संशोधन व विस्तार कार्यात समन्वयाची आवश्यकता आहे.

भारतीय प्रश्नांना भारतीय उत्तरे देण्याचे सामर्थ्य नवीन शैक्षणिक धोरणात आहे. हे धोरण सर्वांग परिपूर्ण, उत्तम तेवढेच व्यवहार्य आहे.



त्याच्या आदर्श तत्त्वज्ञानाची, मूल्यांची व्यवहारात पेरणी व अंमलबजावणी व्हावी यादृष्टीने विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. प्रत्येक विद्यापीठात नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र कक्ष विकसित करण्याची व विशेष सल्लागार नियुक्त करण्याची सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने केली आहे. यादृष्टीने विचार करता शालेय शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण, विद्यापीठीय शिक्षण आणि संशोधनावर आधारलेले शिक्षण या प्रमुख क्षेत्रांत अंमलबजावणीसाठी कार्यदल विकसित करून भारताच्या विविध घटकराज्यात शैक्षणिक धोरणाबाबत जाणीव-जागृती, समन्वय आणि कृतीनियोजनाची विशेष आवश्यकता आहे.

तसे झाले तर प्रगत शिक्षणाच्या आधारे भारत आपली अर्थव्यवस्था अधिक सुदृढ आणि सक्षम करण्यासाठी वाटचाल करू शकेल. आत्मनिर्भर भारताच्या भावी वाटचालीस अर्थव्यवस्था, संरचना, समग्र प्रशासकीय व्यवस्था, प्रबळ लोकसंख्या तसेच विकासप्रेरक मागणी या प्रमुख पाच स्तंभांवर भर देऊन नवी झेप घ्यावी लागेल.अशी उत्तुंग झेप घेण्यासाठी भारतातील तरुणांना त्यांच्या पंखात बळ देण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण प्रेरक ठरू शकेल.

'फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश, दर्या खोर्यांतून वाहे प्रकाश प्रकाश' असा ज्ञानाचा नवा प्रकाश नव्या धोरणामुळे देशाच्या कानाकोपर्यात पसरला तर महानगरे व खेडी तसेच आदिवासी डोंगराळ प्रदेश आणि नागरी वसाहती श्रीमंत आणि गरीब, विकसित आणि अविकसित भाग यांतील अंतर कमी करणे शक्य होईल.तसेच डिजिटलायझेशनच्या युगात शहरे व खेडी यात पडत असलेले अंतर हेसुद्धा कमी करता येऊ शकेल. नव्या धोरणाने भारताच्या इतिहासातील सुवर्णयुगाची आणि समृद्धीची नवी पहाट उदयास यावी अशी अपेक्षा आहे. पुण्यातील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज या संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात गेली २१ वर्षे कार्यरत राहून ज्ञानगंगा नावाने मराठी भाषेतील पहिला डिजिटल विश्वकोश तयार केला आहे. अलीकडच्या काळात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या मुख्य प्रवाहात उतरून ग्रोविंग डॉट्स परख ही प्रणाली विकसित केली आहे जी एआय-संचालित असून, सतत आणि व्यापक मूल्यांकना (सीसीई) साठी अत्यंत उपयुक्त आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे असे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठ पातळीवर सर्व विद्यार्थ्यांना जोडण्यासाठी महत्त्वाची कामगिरी करण्यासाठी प्रयत्न केला आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संस्थेच्या व्यवस्थापनात ग्रोविंग डॉट्स परख आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी कार्यरत झाले आहे आणि केवळ महाराष्ट्र राज्य नव्हे तर भारतीय स्तरावर कर्नाटक, मध्य प्रदेश, गोवा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, गुजरात, राजस्थान आणि दिल्लीतही अनेक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात आहे. एआयच्या माध्यमातून गुणवत्ता, कौशल्य विकास व स्पर्धा परीक्षेत प्राविण्य मिळवण्यासाठी पायाभरणी करीत आहेत.

# कडक उन्हाळ्यात लहान मुलांसाठी झटपट बनवा संत्र्याचे थंडगार आईस्क्रीम, बाजारातील चव विसरूनच

जाल कडक उन्हाळ्यात लहान मुलांसाठी झटपट बनवा संत्र्याचे थंडगार आईस्क्रीम, बाजारातील चव विसरूनच जाल



उन्हाळा ऋतूला सुरुवात झाल्यानंतर लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं आईस्क्रीम खाण्याची इच्छा होते. या दिवसांमध्ये थंड पदार्थ, कोल्ड्रिंक, नारळपाणी, आईस्क्रीम इत्यादी थंड पदार्थांचे भरपूर सेवन केले जाते. मात्र नेहमी नेहमी बाहेरून विकत आणलेले पदार्थ खाण्यापेक्षा घरी बनवलेल्या पदार्थांचे सेवन करावे. बाजारात विकत मिळणारे आईस्क्रीम तयार करताना हानिकारक रंगाचा किंवा दूषित पाण्याचा वापर केला जातो. चुकीच्या पदार्थांचे सेवन केल्यामुळे शरीराची पचनक्रिया बिघडण्याची शक्यता असते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला संत्र्याचा वापर करून थंडगार आईस्क्रीम बनवण्याची सोपी कृती सांगणार आहोत. या पद्धतीने बनवलले आईस्क्रीम चवीला अतिशय सुंदर लागेल याशिवाय घरातील लहान मुलंसुद्धा नक्कीच आवडेल. ीमध्ये बनवा शेवग्याच्या पानांची चटणी, भाकरीसोबत लागेल मस्त

साहित्य:
क्रीम
कंडेन्स मिल्क
संत्र्याची रस
संत्र्याची साल
व्हॅनिला इसेन्स
चिमूटभर मीठ

कृती: संत्र्याचे आईस्क्रीम बनवण्यासाठी सर्वप्रथम, मोठ्या वाटीमध्ये थंड केलेले क्रीम, कंडेन्स्ड मिल्क, संत्र्याचा रस आणि संत्र्याची किसलेली साल टाकून मिक्स करून घ्या.

मिक्स करून झाल्यानंतर त्यात चवीनुसार मीठ आणि व्हॅनिला इसेन्स टाकून मिक्स करून घ्या.

तयार केलेले मिश्रण इलेक्ट्रिक मिक्सरमध्ये ओतून चार ते पाच मिनिटं व्यवस्थित फेटून घ्या. मिक्सरच्या भांड्यात आईस्क्रीम व्यवस्थित फेट्ले जाते.

त्यानंतर तयार करून घेतलेले मिश्रण काचेच्या बंद डब्यात ओतून व्यवस्थित सेट करून घ्या. काचेचा डबा फ्रिजमध्ये ६ ते ७ तासांसाठी तसाच ठेवा.

७ तासांनी आईस्क्रीम बाहेर काढल्यानंतर २ ते ३ मिनिटं डबा बाहेर काढून ठेवा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले संत्र्याचे थंडगार आईस्क्रीम.

# उन्हाळ्यात चेहऱ्यावर आलेले पिंपल्स कमी करण्यासाठी कोरफडच्या रसात मिक्स करा स्वयंपाक घरातील 'हा' पदार्थ



सर्वच ऋतूंमध्ये त्वचेची काळजी घेणे आवश्यक आहे. उन्हाळा वाढल्यानंतर शरीरात उष्णता वाढू लागते. यामुळे बऱ्याचदा आरोग्य आणि त्वचा बिघडण्याची शक्यता असते. शरीरात वाढलेल्या उष्णतेमुळे चेहऱ्यावर मोठ्या प्रमाणावर पिंपल्स, मुरूम किंवा फोड येऊ लागतात. चेहऱ्यावर आलेले हेच छोटे मोठे फोड आणि पिंपल्स घालवण्यासाठी महिला बाजारात उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या केमिकल प्रॉडक्टचा वापर करतात. मात्र चुकीचे प्रॉडक्ट वापरून त्वचेची गुणवत्ता खराब होण्याची शकता असते. चेहरा सुंदर आणि चमकदार करण्यासाठी कोणत्याही ब्युटी क्रीमचा वापर करण्यापेक्षा घरगुती पदार्थांचा वापर करून त्वचेची गुणवत्ता सुधारावी. त्वचेची खराब झालेली गुणवत्ता सुधारण्यासाठी कोरफडच्या रसाचा वापर करावा. यामध्ये असलेले घटक त्वचा कायम हायड्रेट आणि निरोगी ठेवण्यासाठी मदत करतात.

बऱ्याचदा महिला कोरफडचा रस, मध आणि खोबऱ्याचे तेल एकत्र करून त्वचेवर लावतात. यामुळे चेहऱ्यावर वाढलेले पिंपल्स कमी होण्यास मदत होते. चेहऱ्यावर आलेले पिंपल्स कमी करण्यासाठी आणि त्वचा उजळदार करण्यासाठी कोरफडच्या रसाचा वापर करावा. कोरफडच्या रसात अँटी-ऑक्सिडेंट, बीटा-कॅरोटीन, विटामिन सी आणि ई इत्यादी अनेक घटक मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला चेहऱ्यावर आलेले पिंपल्स घालवण्यासाठी कोरफडच्या रसात कोणते पदार्थ मिक्स करून लावावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

पिंपल्सपासून सुटका मिळते:

त्वचेवर वाढलेले पिंपल्स कमी करण्यासाठी कोरफडचा रस वापरावा. यामध्ये खोबऱ्याचे तेल मिक्स करून त्वचेवर लावल्यास चेहरा अतिशय सुंदर आणि चमकदार दिसेल. कोरफडच्या रसात विटामिन सी, ई आणि अँटी-ऑक्सिडेंट इत्यादी अनेक घटक आढळून येतात. यामुळे चेहऱ्यावर आलेली सूज, पिंपल्स आणि पुरळ कमी होण्यास मदत होते. त्वचेच्या छिद्रांमध्ये साचून राहिलेली घाण स्वच्छ करण्यासाठी कोरफड जेल मदत करते. चेहरा उजळदार होतो: उन्हामुळे किंवा वाढत्या पिंपल्समुळे चेहरा अतिशय खराब आणि काळवंडलेला दिसू लागतो. अशावेळी चेहऱ्यावर नियमित कोरफड जेल लावावे. यामुळे त्वचेचा रंग उजळदार दिसू लागेल आणि चेहरा स्वच्छ होईल. सनबर्न, टॅनिंग आणि पिगमेंटेशन इत्यादी सर्वच समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी कोरफड जेल आणि खोबऱ्याच्या तेलाचा वापर करावा.

# वाढलेले वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी अमृता खानविलकर नाश्त्यात करते 'या' स्मूदीचे सेवन, जाणून घ्या स्मूदी बनवण्याची रेसिपी





मराठी सिनेअभिनेत्री अमृत खानविलकर तिच्या अभिनयामुळे, डान्स आणि फिटनेसमुळे सगळीकडे प्रसिद्ध आहे. अमृता सोशल मीडियावर सतत काहींना काही शेअर करत असते. कधी तिचे स्किन केअर, हेल्थ केअर तर कधी हेअर केअर रुटीन सगळ्यांसोबत शेअर करत असते. मराठी इंडस्ट्रीतली फिटनेस आयकॉन अशी अमृता खानविलकरची ओळख आहे. सकाळी उठल्यानंतर सगळ्यात आधी नाश्ता केला जातो. नाश्त्यामध्ये हेल्दी आणि शरीराला सहज पचन होणाऱ्या पदार्थांचे सेवन केले जाते. नाश्त्यामध्ये नेहमीच तेच पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची सगळ्यांचं होते. आज आम्ही तुम्हाला अभिनेत्री अमृता खानविलकर सकाळच्या नाश्त्यात नेमकं कोणत्या पदार्थाचे सेवन करते, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. अमृता सकाळच्या नाश्त्यात 'योगर्ट चिया स्मूदी' चे सेवन करते. नाश्त्यामध्ये स्मूदी खाणे आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. स्मूदी बनवताना अतिशय हेल्दी आणि आरोग्यासाठी आवश्यक असलेल्या पदार्थांचा वापर केला जातो. सोशल मीडियावर नुकताच अमृताने एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्या व्हिडिओला तिने 'अमृता खानविलकर काय खाते?' असे हटके कॅप्शन दिले जाते. अमृता तिच्या आहारात, नाश्त्यात नेहमीच काहींना काही पौष्टिक पदार्थ खात असते.

योगर्ट चिया स्मूदी बनवण्याची कृती:

चिया योगर्ट स्मूदी आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. ही स्मूदी बनवताना दही, चिया सीडस्, खजूर, ओटस् मिल्क आणि सूर्यफुलाच्या बिया इत्यादी पदार्थांचा वापर केला जातो. या पदार्थांमध्ये असलेले गुणधर्म वाढलेले वजन नियंत्रणात ठेवतात, शरीराला ऊर्जा देतात याशिवाय आरोग्य सुधारण्यासाठी मदत करतात. चिया सीड्समध्ये फायबर, ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि प्रथिने इत्यादी अनेक घटक आढळून येतात. त्यामुळे दैनंदिन आहारात या स्मूदीचे सेवन केल्यास आरोग्याला अनेक फायदे होतील.

स्मूदीचे सेवन केल्यामुळे शरीराला होणारे फायदे: ड्रायफ्रूट आणि हेल्दी पदार्थांनी बनवलेली स्मूदी आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. चिया सीड्समध्ये फायबर, ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि प्रथिने भरपूर प्रमाणात आढळून येतात. यामुळे हृदयाचे आरोग्य निरोगी राहते. शरीरात होणारी जळजळ कमी करण्यासाठी चिया सिड्सचे सेवन करावे. आरोग्यासाठी दही खाणे अतिशय फायद्याचे आहे.

# पारंपरिक पद्धतीने घरी बनवा बांगडा फ्राय; पाहता क्षणी तोंडाला पाणी सुटेल



फिश लवर्ससाठी आजची रेसिपी खास ठरणार आहे, कारण आज आम्ही तुमच्यासाठी घेऊन आलो आहोत बांगडा फ्रायची चवदार रेसिपी. नॉनव्हेज लवर्स असाल तर बांगडा फ्राय तुम्ही नक्कीच खाल्ला असेल. बांगडा फ्राय हा महाराष्ट्रीयन खाद्यसंस्कृतील एक लोकप्रिय पदार्थ आहे. ही कोकणातील एक पारंपरिक आणि अतिशय चविष्ट सीफूड डिश आहे. बांगडा हा अत्यंत पौष्टिक आणि ओमेगा-३ फॅटी सिड्सने भरलेला मासा आहे. मसाल्यात मॅरिनेट करुन तव्यावर छान कुरकुरीत भाजून याला खाण्यासाठी सर्व्ह केले जाते.

विकेंड जवळ येत आहे. अशात घरी नॉनव्हेजचा बेत आखत असाल तर ही रेसिपी तुमच्यासाठी परफेक्ट आहे. बांगडा फ्राय तयार करण्यासाठी विशेष अशा साहित्याची आवश्यकता लागत नाही. यासाठी घरगुती मसाल्यांची गरज असते, जी या पदार्थाला आणखीन चवदार बनवतात. शिवाय यात तुमचा फारसा वेळही जाणार नाही. चला तर मग बांगडा फ्राय तयार करण्यासाठी लागणारे साहित्य आणि कृती जाणून घेऊया.

साहित्य:
- बांगडे – ४
- हळद – १/२ टीस्पून
- लाल तिखट – १.५ टेबलस्पून
- आलं-लसूण पेस्ट – १ टेबलस्पून
- लिंबाचा रस – १ टेबलस्पून
- मीठ – चवीनुसार
- रवा – २ टेबलस्पून (कोटिंगसाठी)
- तांदळाची पीठ – १ टेबलस्पून
- तेल – तळण्यासाठी

कृती:

यासाठी बांगड्यांना स्वच्छ धुऊन, त्यातील घाण काढून घ्या

यानंतर बांगड्यावर २-३ खोल चिरे पाडा

आता एका भांड्यात हळद, लाल तिखट, आलं-लसूण पेस्ट, लिंबाचा रस आणि मीठ एकत्र करून घट्ट पेस्ट तयार करा

ही पेस्ट बांगड्यावर नीट लावून कमीत कमी ३० मिनिटे मुरवायला ठेवा, यामुळे सर्व मसाले बांगड्यात मूरतील, ज्यामुळे चव आणखीन छान लागेल

आता रवा व तांदळाचे पीठ एकत्र करून एका प्लेटमध्ये ठेवा

मग मसाल्यात मॅरीनेट केलेला बांगडा नीट रवा-तांदळाच्या पिठात चांगला कोट करा

नॉनस्टिक तव्यावर थोडं तेल गरम करा आणि मध्यम आचेवर बांगडे दोन्ही बाजूंनी खरपूस तळून घ्या

दोन्ही बाजूंनी बांगड्याला छान कुरकुरीत होईपर्यंत तळा

गरमागरम बांगडा फ्राय भाकरी, वरणभात किंवा सोलकडीबरोबर सर्व्ह करा

# आंब्याची कुयरी फेकून न देता चमकदार त्वचेसाठी घरीच बनवा बॉडी बटर, उन्हाळ्यात अंग होणार नाही चिकट



उन्हाळाच्या दिवसांमध्ये बाजारात मोठ्या प्रमाणावर आंबे उपलब्ध असतात.हापूस आंब्यांचे नाव ऐकताच अनेकांच्या तोंडाला पाणी सुटते. चवीला गोड आणि रसाळ आंबे सगळ्यांचं खूप आवडतात. आंबे खाल्यानंतर आंब्यांच्या आतील कुयरी फेकून दिली जाते. आंबा खाताना आंब्याची कुयरी व्यवस्थित खाल्ली जाते. आंबा खाल्यानंतर कुयरी फेकून देण्याऐवजी त्यापासून तुम्ही स्किन केअर प्रॉडक्ट तयार करू शकता. उन्हाळा वाढल्यानंतर जास्त वेळ उन्हात गेल्यामुळे त्वचा अतिशय कोरडी आणि काळवंडून जाते. काळी झालेली त्वचा पुन्हा उजळवण्यासाठी अनेक वेगवेगळ्या प्रॉडक्टचा वापर केला जातो. मात्र त्वचेला सूट न होणाऱ्या प्रॉडक्टचा वापर त्वचेसाठी अजिबात करू नये.

कडक उन्हाळ्यात त्वचेची आद्रता आणि ओलावा टिकवून ठेवण्यासाठी बॉडी वॉश किंवा बॉडी बटचा वापर केला जातो. यामुळे त्वचेमधील ओलावा कायम टिकून राहतो. पण बाजारात उपलब्ध असलेले महागडे प्रॉडक्ट वापरण्यापेक्षा घरगुती पदार्थांपासून सोप्या पद्धतीमध्ये बॉडी बटर तयार करावे. नैसर्गिक पदार्थांचा वापर करून बनवलेले बॉडी बटर त्वचा कायम सुंदर आणि चमकदार ठेवण्यासाठी मदत करते. वाढत्या उन्हाळ्यात केमिकल्सयुक्त मॉइश्चरायझर किंवा बॉडी बटर लावण्यापेक्षा घरी बनवलेल्या बॉडी बटरचा वापर करावा.

आंब्याच्या कुयरीचे त्वचेला होणारे फायदे:

आंब्याची क्युरी आरोग्याच्या दृष्टीने अतिशय पौष्टिक आणि गुणकारी आहे. यामध्ये विटामिन सी, विटामिन ई, प्रोटीन, जिंक, पोटॅशियम, कॅल्शियम मिनरल्स इत्यादी अनेक घटक आढळून येतात. यामुळे त्वचेची खराब झालेली गुणवत्ता सुधारण्यास मदत होते. उन्हाळ्यासह इतर सर्वच ऋतूंमध्ये त्वचेची योग्य काळजी घ्यावी. या दिवसांमध्ये त्वचा अतिशय तेलकट किंवा चिकट होऊन जाते. चिकट झालेली त्वचा सुधारण्यासाठी योग्य स्किन केअर प्रॉडक्टचा वापर करावा. उन्हाळ्यात फंगल इंन्फेक्शनपासून सुटका मिळवण्यासाठी त्वचा योग्य पद्धतीने स्वच्छ करावी.

बॉडी बटर तयार करण्याची सोपी कृती:

आंब्याच्या कुयरीपासून बॉडी बटर तयार करण्यासाठी आंब्याचा सगळं गर चमच्याने काढून घ्या. त्यानंतर त्याच्या आतील पांढरा भाग सुरीच्या सहाय्याने काढा. त्यातील पांढऱ्या रंगाची बी किसणीच्या सहाय्याने किसून घ्या. त्यानंतर भांड्यात तयार शिया बटर आणि खोबरेल तेल एकत्र मिक्स करून गॅसवर मंद आचेवर ठेवून द्या. त्यानंतर त्यात बारीक किसून घेतलेली आंब्याच्या कुयरी टाकून मिक्स करा. तयार करून घेतलेले मिश्रण थंड झाल्यानंतर काचेच्या डब्यात भरून ठेवा. हे बॉडी बटर नियमित अंगाला लावल्यास त्वचा मुलायम आणि चमकदार होण्यास मदत होईल.

# जगन्नाथपुरीच्या मंदिरात प्रसाद म्हणून दिले जाते पौष्टिक पेय, चवीसह आरोग्यासाठी ठरेल गुणकारी





जगभरातील प्रत्येक मंदिरांमध्ये प्रसाद म्हणून अनेक वेगवेगळे पदार्थ किंवा पेय दिले जाते. असेच ओडिसामधील जगन्नाथपुरी मंदिरात प्रसाद म्हणून दिले जाते. हे पेय आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आणि गुणकारी आहे. शिजवलेल्या भाताचा वापर करून तयार केलेले पेय जगभरात सगळीकडे प्रसिद्ध आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शरीरात वाढलेली उष्णता कमी करण्यासाठी आणि शरीराला थंडावा देण्यासाठी या पेयाचे सेवन केले जाते. शिजवलेले भात रात्रभर आंबवून त्यापासून पदार्थ तयार केला जातो. जगन्नाथपुरीच्या मंदिरात प्रसाद म्हणून मिळणारे पेय ओडिसामधील प्रसिद्ध पदार्थ आहे. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला जगन्नाथपुरीच्या मंदिरात प्रसाद म्हणून मिळणारे हेल्दी पेय सोप्या पद्धतीमध्ये कसे बनवावे, याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. या पद्धतीने बनवलेले पेयघरातील सगळ्यांचं खूप जास्त आवडेल.

शिजवलेला भात
मीठ
हिरवी मिरची
दही
हळद
लिंबाची पाने
लिंबाचा रस
जिऱ्याची पावडर
पाणी

कृती: जगन्नाथपुरीच्या मंदिरात बनवलेले जाणारे पेय तयार करण्यासाठी सर्वप्रथम, शिजवलेल्या भाताचा वापर करावा. यासाठी मोठ्या भांड्यात भात घेऊन त्यात पाणी घालून २४ तास भात तसाच झाकून ठेवा.भात शरीरासाठी चांगल्या बॅक्टरीया तयार करतो.

रात्रभर भिजत ठेवलेल्या भातामध्ये हळद टाकून मिक्स करून घ्या. त्यानंतर त्यात बारीक चिरून घेतलेली हिरवी मिरची, लिंबाची पाने आणि चवीनुसार मीठ घालून मिक्स करून घ्या.

त्यानंतर भात व्यवस्थित कुसकरून घ्या. कुसकरून घेतलेल्या भातामधील पाणी गाळणीच्या सहाय्याने गाळून वेगळे करा.


त्यानंतर त्यात कढीपत्त्याची पाने आणि लिंबाचा रस टाकून पुन्हा एकदा मिक्स करून घ्या. सगळ्यात शेवटी त्यात जिऱ्याची पावडर घालून मिक्स करून घ्या. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले जगन्नाथपुरी मंदिरातील प्रसिद्ध पेय.

# उष्णतेमुळे अंगाची काहिली होते? शरीर थंड ठेवण्यासाठी नियमित करा 'या' रसाचे सेवन, राहाल कायम फ्रेश आणि ताजे

राज्यासह संपूर्ण देशभरात उष्णतेचे वारे वाहू लागले आहेत. याशिवाय अचानक वातावरणात होणाऱ्या बदलांचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. त्यामुळे शरीराची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. शरीरात सतत होणारे बदल आरोग्यासाठी अतिशय घातक ठरतात. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शरीरात उष्णता वाढण्याची शक्यता असते. उष्णता वाढल्यानंतर पोटात आग होणे, वारंवार घाम येणे, तळपायांमध्ये आग होणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये आहारात आवळ्याच्या रसाचे नियमित सेवन करावे. आवळा हे फळ आरोग्याच्या दृष्टीने अतिशय गुणकारी आणि पौष्टिक आहे. यामध्ये असलेले गुणधर्म शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर काढून टाकण्यासाठी मदत करतात. उन्हाळ्यासह इतर सर्वच दिवसांमध्ये बाजारात आवळा हे फळ उपलब्ध असते. आवळ्याचे सेवन केल्यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते. याशिवाय यापासून जाम, लोणचे आणि कँडी इत्यादी अनेक पदार्थ बनवले जातात. आवळ्यामध्ये लोह, कॅल्शियम, पोटॅशियम, प्रथिने, अँटीऑक्सिडंट, पॉलीफेनॉल इत्यादी अनेक घटक आढळून येतात. दैनंदिन आहारात सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी आवळ्याच्या रसाचे सेवन केल्यास शरीराला अनेक फायदे होतील. आज आम्ही तुम्हाला शरीर स्वच्छ करण्यासाठी कशी पद्धतीने आवळ्याच्या रसाचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया. आवळा पुदिन्याचा रस: शरीरात वाढलेली उष्णता नियंत्रणात ठेवण्यासाठी आवळा पुदिन्याच्या रसाचे सेवन करावे. पुदिना शरीरात थंडावा टिकवून ठेवण्याचे काम करतो. याशिवाय शरीरात वाढलेली उष्णता कमी होऊन जाते. सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी आवळा पुदिन्याच्या रसाचे सेवन केल्यास शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातील आणि शरीर स्वच्छ होण्यास मदत होईल.

# ‘जनसंपर्कतज्ज्ञ : प्रा. सुरेशजी पुरी लोकपत्रकारिता’ पुरस्काराची घोषणा!

## ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अमर हबीब पहिले मानकरी.





ज्येष्ठपत्रकार, सामाजिककार्यकर्ते अमरहबीबपहिलेमानकरी. छ. संभाजीनगर / प्रतिनिधी : – शब्दवेध बुक हाऊस प्रकाशन संस्थेच्या वतीने जनसंपर्क तज्ज्ञ प्रा. सुरेशजी पुरी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त, ‘जनसंपर्कतज्ज्ञ : प्रा. सुरेशजी पुरी लोकपत्रकारिता’ पुरस्काराची आज घोषणा करण्यात आली. या पुरस्काराचे मानकरी म्हणून ज्येष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अमर हबीब, अंबाजोगाई यांची निवड करण्यात आली आहे. संवेदनशील पालक, विद्यार्थीप्रिय प्राध्यापक, लोकोपयोगी व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाचे माजी प्रमुख प्रा. सुरेश पुरी सर हे संबंध देशभरात परिचित आहेत. त्यांनी आतापर्यंत शेकडो विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारले आहे. तेच विद्यार्थी आणि लाभार्थी समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या कार्याची कृतज्ञता म्हणून शब्दवेध बुक हाऊस या प्रकाशन संस्थेच्या वतीने या वर्षापासून सदर पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे. ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब हे दैनिक मराठवाडाच्या लातुर आवृत्तीचे संपादक होते. ते शेतकरी संघटनेतील सक्रिय कार्यकर्ते असून त्यांनी शेतकरी आत्महत्या संदर्भात लेखनासह कृतीशील उपक्रमही राबवले आहेत. त्यांनी सामाजिक चळवळीच्या अनुषंगाने अनेक पुस्तकेही लिहिली आहेत.त्यात ‘नाते, कलमा, संवाद, आकलन, शेतकरी विरोधी कायदे’सह दहा पुस्तके त्यांची प्रकाशित झाले आहेत. ‘शेतकरी विरोधी कायदे’ या ग्रंथाचा वेगवेगळ्या भाषेत अनुवादही झाला आहे. ते सध्या आंतरभारती मासिकाचे संपादक आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन अमर हबीब यांची निवड केल्याचे प्रकाशक वैजनाथ वाघमारे यांनी सांगितले. जनसंपर्क विषय विद्यापीठात शिकविताना प्रा. पुरी सरांनी लोकसंपर्कच अधिक ठेवला. ते कधीच रूबाबदार प्राध्यापक न होता, जबाबदार पालक झाले. त्यामुळे त्यांचे शेकडो विद्यार्थी देशाच्या विविध क्षेत्रात कार्यरत असले तरी प्रा. पुरी यांच्याबद्दल अत्यंत कृतज्ञशील आहेत. प्रा. पुरी यांचे ‘जनसंपर्क : संकल्पना आणि सिद्धांत’ हा ग्रंथ खूप लोकप्रिय ठरला. तो विद्यापीठीय विद्यार्थ्यांसह सार्वजनिक जीवनात काम करणार्यांसाठी अत्यंत उपयोगी म्हणूनच त्या ग्रंथाकडे पाहिले जाते. हाच ग्रंथ हिंदीतही प्रकाशित झाला असून ‘महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी’चा बाबुराव विष्णू पराडकर पुरस्कारही या ग्रंथाला मिळाला आहे. सन २०१० साली प्रा. पुरी यांच्यावर ज्येष्ठ पत्रकार महारूद्र मंगनाळे यांनी ‘आई मनाचा माणूस’ हा ग्रंथ संपादित केला असून लातुरच्या मुक्तरंग प्रकाशनाच्या वतीने प्रकाशित करण्यात आला आहे. या ग्रंथाच्या दोन आवृत्त्या निघाल्या आहेत.

अकरा हजार रुपये रोख रक्कम, मानचिन्ह असं या पुरस्काराचे स्वरूप आहे. सदर कार्यक्रम दिनांक १८ मे २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता मौलाना आझाद संशोधन केंद्र, मजनु हिल येथे संपन्न होणार आहे. पुरस्काराचे पहिलंच वर्ष असून यापुढेही लोकपत्रकारिता करणार्या पत्रकारांचा सन्मान करताना या पुरस्काराचे मूल्य जपण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न राहील, असे वाघमारे यांनी सांगितले. यावेळी पत्रकार परिषदेला प्रभाकर अर्सूड, डॉ. संजय गायकवाड उपस्थित होते.

## जीवन शिक्षण उच्च माध्यमिक विद्यालय केज चा बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९९ टक्के




केज/प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता बारावीचा निकाल दिनांक पाच मे रोजी जाहीर झाला. या परीक्षेमध्ये जीवन शिक्षण उच्च माध्यमिक विद्यालय इयत्ता विज्ञान शाखेचा ९९ टक्के निकाल लागला तर त्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव हारून भाई इनामदार संस्था सहसचिव यासिन इनामदार नगराध्यक्ष सौ सीता ताई बनसोड मॅडम, नगरसेवक राजू भाई इनामदार, प्राचार्य श्री हंडीबाग सर ,मुख्याध्यापक श्री ढाकणे सर ,मुख्याध्यापक श्री ठोंबरे सर, बंसल क्लासेस चे श्री ठोंबरे सर , बारावी विज्ञान शाखाप्रमुख हावळे सर, वस्तीग्रह विभाग श्री शिंदे सर ,बीएससी विभाग श्री साखरे सर व सर्व कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले .प्रथम क्रमांक मौजन जैद फसीयुद्दीन द्वितीय क्रमांक खंडागळे आश्लेषा प्रशांत तृतीय क्रमांक इनामदार सदफ खाजा मैनोद्दीन या विद्यार्थ्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे

# विश्वधर्मी मानवतातीर्थ म्हणून जगात रामेश्वर (रुई) ची ओळख पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांचे विचार: नामकरण कोनशिलेचे अनावरण; ‘विश्वशांतीची ज्ञान ज्योती’चे प्रज्वलन

लातूर : – भारत भूमीत अमुलाग्र बदल घडत असतांना रामेश्वर रूई गावचे नामांतर विश्वधर्मी मानवतातीर्थ म्हणून करण्यात आले. या गावची जगात ओळख झाल्याशिवाय राहणार नाही. देशात ६ लाख गावे असून या गावागावात मोठे बदल घडतील. यामुळेच भारत देश संपूर्ण जगात आदर्श राष्ट्र म्हणून उदयास येईल. असे विचार जगविख्यात संगणक शास्त्रज्ञ व नालंदा विद्यापीठाचे माजी कुलपती पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे व मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने संत श्री गोपाळबुवा महाराज विश्वशांती हरिनाम सप्ताहाचे औचित्य साधून विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांच्या प्रेरणेने व पूर्ण ब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती प्रयागअक्का कराड यांच्या आशीर्वादाने विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई) नामकरण सोहळ्या प्रसंगी डॉ. विजय भटकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी सन्माननीय पाहुण्यांच्या हस्ते ‘विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर (रुई)’ नामकरण कोनशिलेचे अनावरण आणि ‘विश्वशांतीची ज्ञान ज्योती’ चे प्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड होते. याप्रसंगी माईर्स एमआयटीचे कार्यकारी अध्यक्ष व एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल कराड, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण,ज्येष्ठ कवी व लेखक डॉ. संजय उपाध्ये, गिरीश दाते, हभप तुळशीरामअण्णा कराड, प्रगतशील शेतकरी काशीरामनाना कराड, माईर्स एमआयटीचे अध्यक्ष डॉ. मंगेश कराड, आ. रमेशआप्पा कराड, डॉ. सुचित्रा कराड नागरे, राजेश कराड, व एमआयटी डब्ल्यूपीयूचे प्रा. कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे हे उपस्थित होते.

डॉ. विजय भटकर म्हणाले, डॉ. विश्वनाथ कराड यांनी रामेश्वर च्या माध्यमातून आदर्श गावाचे उदाहरण जगासमोर मांडले. या गावात सर्व जाती पातीचे लोक एकत्रित राहतात. गुण्या गोविंदाने नांदतात हा संदेश संपूर्ण विश्वात पोहचेल. खर्या अर्थाने हे गांव मानवतातीर्थ म्हणून उदयास आले आहे.

प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, देशाला जाती धर्माचा शाप लागला आहे. अशा वेळेस वारकरी संप्रदाय हा मानवतेचा संदेश देणारा धर्म आहे. त्याग आणि समर्पणामुळे या गावाची ओळख ज्ञान यज्ञ भूमी म्हणून झाली आहे. वर्तमान काळात जगाची अवस्था ही अत्यंत वाईट होत चालली आहे. अशा वेळेस सर्वांना शांतीची आवश्यकता आहे.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले, मानवतातीर्थ काय असते डॉ. विश्वनाथजी कराड साहेबांनी जिद्द चिकाटी आणि कष्टातून निर्माण करून दाखविले आहे हे काम सहजासहजी होत नाही तुमच्यात परमेश्वराचा आंश आम्हाला दिसतो. त्यांच्या कार्यामुळे या गावाची ओळख संपूर्ण जगात झाली. सामाजिक कार्यासाठी त्यांनी जीवन समर्पित केले. उतुंग व्यक्तिमत्त्व असूनही प्रत्येक सण गावात येऊन साजरे करतात हे कराड कुटुंबाचेच नव्हे तर या गावाचे भाग्य आहे. अण्णाभाऊंनी केवळ देव देवतांची मंदिरे उभारली नाही तर ज्ञानाचे मंदिर उभी करून पुढची पिढी घडवित आहेत. माझ्या हातून जी काही कामे होतात अण्णाभाऊंच्या प्रेरणेतूनच होत आहेत आजच्या याक्षणी ग्रामस्थांनी संकल्प करून एका मनाने एका विचाराने वागू, कोणताही भेद भाव न करता गावचा सर्वांगीण विकास घडवून आणू.



प्रा. डॉ. मंगेश तु. कराड म्हणाले की, डॉ. विश्वनाथजी कराड यांनी आपल्या नावाला अनुसरूणच विश्व कार्य सुरू केले. त्यांनी जगातील सर्वात मोठ्या विश्वशांतीच्या डोमची निर्मिती केली आहे. डॉ. एस. एम. पठाण म्हणाले, रामेश्वर गावाची नोंद महाराष्ट्राने घेऊन या संदर्भात जीआर काढावा. वर्तमान काळातील स्थिती पाहता आपल्याला युद्धाकडून बुद्धाकडे जावयाचे आहे. तर डॉ. संजय उपाध्ये म्हणाले, छोट एकच काम करा, प्रत्येकाने आपले गाव मोठे करा असा सल्ला देऊन रामेश्वर चे आज झाले मानवतातीर्थ ही कविता सादर केली. पुढच्या पिढीला कसे तयार व्हावे हे सांगणारे व्यक्तिमत्व डॉ. विश्वनाथ कराड आहेत.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे प्रा. कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे यांनी प्रस्तावनेत माईर्स एमआयटी द्वारे चालविल्या जाणार्या सर्व कार्यांची माहिती देऊन विश्वामध्ये मानवता किती महत्वाची आहे हे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मिलिंद पात्रे यांनी केले. शेवटी डॉ. सुचित्र कराड नागरे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास रामेश्वर आणि पंचक्रोशीतील भावीक भक्त महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. विश्वशांतीसाठी ज्ञान ज्योतीचे प्रज्वलन विश्वबंधुत्व, सर्वधर्मसमभाव, समंजस्य आणि एकोप्याचं मूर्तिमंत प्रतीक असलेलं गावं विश्वधर्मी मानवतातीर्थ रामेश्वर रुई येथे मंगळवारी ‘विश्वशांतीची ज्ञान ज्योती’ चे प्रज्वलन करण्यात आले. नंतर ज्योत डॉ. विश्वजीत नागरगोजे आणि त्यांच्या सहकाऱ्याकडे हस्तांतरण करण्यात आली. ही ज्योत ज्ञानभूमी आळंदीपासून, सांप्रदायिक सद्भावनाभूमी अजमेर, शक्तिभूमी अमृतसर आणि तिथून भारताची आध्यत्मिक राजधानी आयोध्या इथे प्रभु श्रीरामचंद्रांना वंदन करून बोधगया, वैशाली, जेरूसलेम, व्हॅटिकन सिटी मार्गे संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यालयात समर्पित करण्यात येणार आहे.

## जुन्या वाहनांवर ३० जूनपूर्वी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविणे बंधनकारक

### लातूर जिल्ह्यातील अधिकृत फिटमेंट सेंटरद्वारे सुविधा उपलब्ध

लातूर :– जिल्ह्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित झालेल्या वाहनांवर सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांवर ३० जून २०२५ पूर्वी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविणे बंधनकारक आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यातील वाहनधारकांनी नजीकच्या अधिकृत फिटमेंट सेंटर येथून हायसिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याची कार्यवाही लवकरात लवकर करावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी केले आहे. वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे, यासह राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविणे आवश्यक असून सर्वोच्च न्यायालयानेही याबाबत निर्देश दिले आहेत. या निर्देशांची अंमलबजावणी व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित झालेल्या सर्व वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याचा निर्णय घेतला आहे. या सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्यासाठी लातूर जिल्ह्यातील अधिकृत फिटमेंट सेंटरची यादी परिवहन विभागाच्या या लिंकवर उपलब्ध आहे. या लिंकवर जावून एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी बुकींग करावी. ३० जून २०२५ रोजी नंतर जुन्या वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याबाबत शासनाकडून कोणतीही मुदतवाढ देण्यात आलेली नाही. ३० जून, २०२५ नंतर जुन्या वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट न बसविलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल येणार आहे. तरी वाहनधारकांनी एचएसआरपी बसविण्याची कार्यवाही लवकरात लवकर करावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी केले आहे.

## चीनच्या जे-३६ ला टक्कर देण्यासाठी जपानचे भारताला आवतण

बीजिंग : भारताला बुलेट ट्रेनचे तंत्रज्ञान पुरविणा-या जपानने चक्क सहाव्या पिढीचे जेट फायटर तयार करण्यासाठी भारताला निमंत्रण दिले आहे. हा आंतरराष्ट्रीय प्रस्ताव जपानने भारताला चीनचे जेट फायटर जे-३६ ला टक्कर देण्यासाठी दिला आहे. भारताने रशियाकडे सुखोईची लेटेस्ट पाचव्या पिढीच्या विमानासाठी विचारणा केली होती. परंतू देखभालीसह तंत्रज्ञान स्ट्रान्सफर करण्यास रशिया तयार नसल्याने हा प्रस्ताव बारळगला आहे.

६ व्या पिढीचे लढाऊ जेट विमान विकसित करण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नात सामील होण्यासाठी जपानने भारताला आमंत्रण दिले आहे. या पावलामुळे इंडो-पॅसिफिक प्रदेशातील लष्करी गतिशीलता पुन्हा एकदा सक्रीय होणार असून चीनच्या संभाव्य वाढत्या कुरापतींना शह देण्यासाठीचे हे पाऊल असल्याचे म्हटले जात आहे. या आंतरराष्ट्रीय प्रयत्नांत भारत सामील होतो की नाही यावर अद्यापही भारताने कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. भारताकडे पाचव्या पिढीचेही फायटर जेट सध्या नाही. सध्या भारताकडे फ्रान्सने दिलेली राफेल विमाने आहेत. राफेल हे चौथ्या पिढीचे विमान आहे. परंतू रडारवर जराही न दिसणा-या पाचव्या पिढीच्या फायटर विमानांची भारतीय वायु सेनेला तातडीने गरज आहे. ग्लोबल कॉम्बॅट एअर प्रोग्रॅमअंतर्गत जपानने भारतात पुढे सहाव्या पिढीच्या विमानाला विकसित करण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नात सामील होण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

## डोळ्यावर पडदा पडतो त्याला गैरसमज म्हणतात..! – समाजभूषण : उत्तमराव तरकसे



नवी मुंबई :– नवीन पनवेल के. आ. भाटिया विद्यालय नवीन पनवेल नवी मुंबई येथे ललित कला फाउंडेशन ठाणे यांच्या वतीने काव्य संमेलन व गझल मैफिल आसे दोन दिवशीय सम्मेलन आयोजित करण्यात आले होते सदर संमेलनाचे अध्यक्ष म्हणून प्रा. श्री तुकाराम पाटील (रयत शिक्षण संस्था) ए. के. शेख (ज्येष्ठ गजलकार), श्री रोहिदास पोटे (समीक्षक व गझलकार), श्री दिलीप कारखानीस (संस्थापक अध्यक्ष ललित कला फाउंडेशन ठाणे), असे विचार मंचावर उपस्थित होते तसेच निमंत्रित कवी म्हणून समाजभूषण : श्री उत्तमराव दासु तरकसे (असरडोहकर) महाराष्ट्र शासनाचा समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत, यांच्यासह बहुतांश कवी लेखक साहित्यिक रशीक खूपच मोठ्या प्रमाणात मोठ्या संख्येने हजर होते सदर कार्यक्रमात समाजभूषण उत्तम तरकसे यांनी कानातून प्रवेश करतो आणि डोळ्यावर पडदा पडतो त्याला गैरसमज म्हणतात हा एकदा मनात तयार झाला की सरळ माणसाच्या सरळ गोष्टी पण वाकड्या वाटायला लागतात

असे काव्यातून प्रबोधनात्मक कवितेचे सादरीकरण केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रणय इंगळे व सौ नंदिता काळे यांनी खूप उत्तम प्रकारे सादरीकरण केले तसेच कार्यक्रमातच्या शेवटी दिलीप कारखानीस यांनी सर्व उपस्थित प्रमुख पाहुणे व निमंत्रित कवी साहित्यिकांचे आभार मानत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज तालुकाध्यक्षपदी दिनकर जाधव यांची निवड



केज /प्रतिनिधी केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथील रहिवासी असलेले तथा गेल्या दीड दशकाहून अधिक काळ पत्रकार क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत सामाजिक प्रश्न सरकार दरबारी मांडणारे पत्रकार दिनकर किसनराव जाधव यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाच्या केज शाखेच्या तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जान असणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. गेल्या दीड दशकापासून त्यांच्या पत्रकारितेमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अधिक अधिक आवाज उठवण्याचे काम त्यांनी केले आहे. तसेच अनेक सामाजिक प्रश्न त्यांनी शासन दरबारी मांडत त्याचा पाठपुरावा केलेला आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी, राज्य अध्यक्ष विष्णू कंकाळ यांच्या आदेशाने राज्य सचिव दत्तात्रय मुजमुले यांनी दिनकर किसनराव जाधव यांची केज तालुका अध्यक्षपदी निवड केली आहे. या निवडीबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# पोलिस ठाणे एमआयडीसी, लातूर पोलीसांची प्रतिबंधीत गुटख्यावर कारवाई.

पोलिस ठाणे एमआयडीसी, लातूर :– लातूर पोलीसांची प्रतिबंधीत गुटख्यावर कारवाई.✻

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पो.स्टे. एमआयडीसी, लातुर हद्दीमध्ये गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीवरुन सागर किराणा दुकान, बार्शी रोड पाण्याचे टाकीजवळ लातुर येथे गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलीस अंमलदार यांचेकडुन सदर ठिकाणी छापा मारला असता महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केले ला किंमत १,९७,१९०/- रुपयाचा गुटखा मिळुन आल्याने इसम नामे १) इरफान हबीब शेख, वय ४१ वर्षे रा. काझी मोहल्ला,आनंद नगर लातुर. यांचेवर पोलिस ठाणे एमआयडीसी, लातुर येथे गुरनं. ३६४/२०२५ कलम १२३,२७४,२७५,२२३ बिएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत मोरे हे करत आहेत.




सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातुर शहर रणजित सावंत यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांचे नेतृत्वाखाली पोलीस उप निरीक्षक श्रीकांत मोरे, सफौ भिमराव बेल्लाळे, शिंगाडे, पोलिस अमलदार भगवत मुळे,बळवंत भोसले, राजाभाऊ मस्के, प्रशांत ओगले, इश्वर तुरे, महीला पोलीस अंमलदार पल्लवी शिवणकर यांनी केली आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE